Marketing and Publicity Dept.,
Head Office, Lokmangal
1501, Shivaji Nagar, Pune 411 005
020- 25614385
cmmedia@mahabank.co.in; agmmkt@mahabank.co.in;

**प्रेस-नोट**

**बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये हिन्दी दिवस मोठ्या उत्साहात साजरा**

**पुणे, सप्टेंबर 19, 2019**: आपुलकीने उत्तम ग्राहका सेवा देण्यामध्ये हिन्दी आणि स्थानिक भाषा महत्वपूर्ण भूमिका वठवत असल्याचे प्रतिपादन बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ श्री ए. एस. राजीव यांनी केले. ते म्हणाले की, बँकेच्या योजनांचा प्रचार-प्रसार करणे आणि प्रत्येक व्यक्तीपर्यंत आपले म्हणणे पोहोचवण्यासाठी हिन्दी हा खूप चांगलापर्याय आहे. बँकेस नुकताच हिन्दी भाषेचा सर्वोच्च कीर्ती पुरस्कार प्राप्त झाला आहे ही आमच्यासाठी खूप अभिमानाची बाब आहे असेही ते म्हणाले. बँक ऑफ महाराष्ट्रच्या लोकमंगल स्थित मुख्यालयी बुधवारी हिन्दी दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री ए. एस. राजीव होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रख्यात फिल्म अभिनेत्री सोनाली कुलकर्णी या उपस्थित होत्या. बँकेचे संचालक श्री एम. के. वर्मा, कार्यकारी संचालक श्री ए. सी. राउत , कार्यकारी संचालक श्री हेमन्त टम्टा, सरव्यवस्थापक डॉ एन. मुनिराजू यांची विशेष उपस्थिती होती. देशभरातून आलेले बँकेचे उच्च पदस्थ, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची या कार्यक्रमास लक्षणीय उपस्थिती होती.

सरव्यवस्थापक डॉ. एन. मुनिराजु यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमात माननीय गृहमंत्री यांनी पाठवलेल्या संदेशाचे वाचन श्रीमती लोकप्रभा वाघे यांनी तर माननीय अर्थमंत्री यांच्या संदेशाचे वाचन श्रीमती पूर्णिमा पद्मासना यांनी केले. बँकेच्या ई-पत्रिकेच्या वार्षिक संकलनाचे प्रकाशन श्री ए. एस. राजीव, सोनाली कुलकर्णी आणि व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात अखिल भारतीय स्तरावरील आंतर राजभाषा चषक योजनांची बक्षिसे संपूर्ण देशातून आलेल्या अंचल प्रमुख आणि शाखाप्रमुखांना वितरित केली गेली.

यावेळी बोलताना सोनाली कुलकर्णी म्हणाल्या की, हिंदीच्या प्रचार-प्रसारामध्ये हिन्दी सिनेमा आणि दूरचित्रवाणीचे मोठे अंशदान आहे. हिन्दी ही एक सहज आणि सरल भाषा आहे आणि भारताच्या प्रत्येक भागात - प्रांतात बोलली जाते. सोनाली यांनी बँक ऑफ महाराष्ट्रशी असलेल्या विशेष सुंनेहाचे नाते उघड केले. त्यांचे आजोबा याच बँकेत असल्याचे आणि लग्नापूर्वी त्यांचे निवासस्थान बँक ऑफ महाराष्ट्रच्या कॉलनीत असल्याने ही बँक माझ्या कुटुंबाची एक अविभाज्य सभासद वाटत असल्याचे त्या म्हणाल्या.

श्री एम. के. वर्मा यांनी संगितले की, हिन्दी या भाषेचा गोडवा इतका अवीट आहे की अहिंदी राज्यातही ही भाषा बोलली आणि समजली जाते.

कार्यकारी संचालक श्री. ए. सी. राउत यांनी बँक ही व्यापारी संस्था आहे आणि व्यापारासाठी स्थानीय भाषा ग्राहकांना समजत असल्याने आणि त्यामुळे याचा व्यवसायावर सकारात्मक परिणाम होत असल्याने आपण हिंदीचा अधिकाधिक वापर केला पाहिजे असे ते म्हणाले.

कार्यकारी संचालक श्री हेमन्त टम्टा म्हणाले की, मनोरंजनासह साहित्य, व्यापार आणि टेक्नालॉजीची देखील हिन्दी भाषा असून ते एक आपलेपणा वाटणारे महत्वपूर्ण माध्यम आहे.

विपणन व प्रचार विभागाचे सहायक सरव्यवस्थापक श्री विवेक नाचणे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहायक सरव्यवस्थापक डॉ. राजेन्द्र श्रीवास्तव, यांनी केले.

**फोटो मध्ये- व्यासपीठावर डावीकडून-** डॉ. एन. मुनिराजु, सरव्यवस्थापक, श्री ए. सी. राउत, कार्यकारी संचालक, श्री एम. के. वर्मा, संचालक, श्री ए. एस. राजीव, व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ, प्रख्यात अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि श्री हेमन्त टम्टा, कार्यकारी संचालक